Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18850412

# संरचना, कुटुंब, विवाह आणि मूल्यांमध्ये होणाऱ्या बदलाचा चिकित्सक अभ्यास

**डॉ. राजू शेषराव पोपळघट[1] & प्रा. मोनिसा दौलत खान[2]**

**प्रस्तावना :-**

समाज ही सतत बदलणारी प्रक्रिया आहे. सामाजिक संरचना, संघटन ,कुटुंब व्यवस्था, विवाह व्यवस्था आणि सामाजिक मूल्य यामध्ये काळानुरूप मोठ्या प्रमाणात बदल होत गेले. औद्योगिकीकरण, शहरीकरण, जागतिकीकरण आणि शिक्षणाचा प्रसार, विज्ञान-तंत्रज्ञान आणि माध्यमांचा प्रभाव यामुळे पारंपारिक समाज संरचना बदलत गेली आणि आधुनिक समाजाची निर्मिती झाली. या संशोधन पेपर मध्ये सामाजिक संघटना आणि सरचना यांची संकल्पना कुटुंब, विवाह संस्था मधील बदल तसेच मूल्य परिवर्तन यांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. समाजशास्त्रात सामाजिक परिवर्तन हा अत्यंत महत्त्वाचा अभ्यास विषय आहे. कोणताही समाज स्थिर नसून तो विविध सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक घटकामुळे सतत बदलत असतो. पारंपारिक भारतीय समाजात संयुक्त कुटुंब, ठरवलेले विवाह, धार्मिक व नैतिक मूल्यांना प्राधान्य होते. परंतु आधुनिक काळात या सर्व घटकांमध्ये मूलभूत बदल दिसून येतात.

**गृहीतके:-**

1. संरचना: समाजाची संरचना बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी बदलते.
2. कुटुंब: कुटुंबाची रचना आणि कार्य बदलत्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी बदलते.
3. विवाह: विवाहाची रचना आणि कार्य बदलत्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी बदलते.
4. मूल्ये: समाजाची मूल्ये बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी बदलते.

सामाजिक संरचन:-

सामाजिक संरचना म्हणजे, समाजातील व्यक्ती, गट, संस्था आणि त्यांच्या परस्परासंबंधाची एक विशिष्ट रचना. जात, धर्म, वर्ग, व्यवसाय, कुटुंब व्यवस्था इत्यादी घटक सामाजिक संरचनेचे भाग आहे.

सामाजिक संरचनेच्या व्याख्या :-

"सामाजिक संरचनेला हर्बर्ट स्पेन्सर ने प्रतिपादित केले आहे. सामाजिक संरचना जसे समाजाचे विविध घटक यामध्ये कुटुंब, संस्था, संघटन, भूमिका, मूल्य आणि रचना यामध्ये सतत परिवर्तन होत राहतो."

लेव्हीस कोझर यांच्या मते, "सामाजिक संरचना म्हणजे सामाजिक घटकांमधील सापेक्षतः स्थिर अशा परस्पर संबंधाचे प्रतिमान होत."

[1] विभाग प्रमुख,समाजशास्त्र विभाग, राजर्षी शाहू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पाथरी, फुलंब्री
[2] विभाग प्रमुख,समाजशास्त्र विभाग, राजर्षी शाहू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पाथरी, फुलंब्री

समाज सरचनेचा अभ्यास विविध समाजशास्त्रज्ञानांनी व मानववंश शास्त्रज्ञांनी केलेला आहे. यामध्ये नेवल प्रीचाङ, पार्सन, ब्राऊन, मेलीनोस्की, हार्बर स्पेन्सर, हॅरी जॉन्सन, आणि रॉबर्ट मार्टन यांचे नाव घेता येईल. मॉरिसगिन्सबर्ग यांनी समाज सरचनेचे घटक म्हणून समूह मंडळे, संस्था यांचा उल्लेख केलेला आहे.

समाज सरचनेचे घटक व्यक्ती नसून विविध सामाजिक दर्जा, किंवा भूमिका हेच आहेत. सामाजिक संरचनेचे स्वरूप बदलले तरी सामाजिक घटक कायमच असतात.

हॅरी जॉन्सन यांच्या मते, "कोणत्याही गोष्टीची संरचना म्हणजे त्या गोष्टीच्या घटकांमधील स्थिर स्वरूपाचे परस्पर संबंध होय." समाज व्यवस्था याच परस्पर संबंधित क्रियांची बनलेली असल्यामुळे या क्रियांच्या नियमितपणात व पुनरावृत्ती मध्ये समाज सरचनेचा शोध घेतला पाहिजे.

उपरोक्त व्याख्येवरून स्पष्ट होते की, संरचनेच्या संकल्पनेत स्थायी व संघटित स्वरूपाचे परस्पर संबंध असतात. या स्थायी गटांनाही एक सरचना असते. गटात अंतर्गत असलेल्या व्यक्तींकडे व्यक्ती म्हणून पाहण्याऐवजी विशिष्ट दर्जाधारक म्हणून पाहिले जाते. या दर्जाला अनुषंगून असलेली भूमिका व्यक्ती पार पाडत असतो. प्रत्येक गटात गटाचा सदस्य म्हणून व्यक्तीस विशिष्ट स्थान असते व्यक्तीची परिस्थिती व व्यक्तीचे पद दोन्ही बाबी एकमेकांशी संबंधित असून एकमेकांवर निर्भर असतात परिस्थिती समाजातील संस्थांतर्गत व्यक्तीची स्थिती दर्शविते.

**दर्जा व भूमिका :-**

सामाजिक संरचनेचा दर्जा व भूमिका या दोन घटकांना समाजव्यवस्था अंतर्गत मध्यवर्ती स्थान असलेले दिसून येते. समाजातील सर्वच व्यक्ती एकमेकांशी वर्तन करताना समाजाअंतर्गत अस्तित्वात असलेल्या लोकरूढी, लोकनीती, लोकरीती, नियम,कायदे या आधारे वर्तन करतात. प्रत्येक समाजात दोन समूह पैलू असतात. एक हक्क आणि विशेष अधिकार दुसरा कर्तव्य आणि जबाबदाऱ्या या दोन संकल्पना समाजशास्त्रात वापरल्या जातात.

1) दर्जा :- कोणत्याही समाज संरचनेअंतर्गत एका विशिष्ट काळात व्यक्तीला प्राप्त झालेले पद, प्रतिष्ठा, सन्मान हा त्यांचा दर्जा संबोधला जातो.

राल्फ लिन्टन यांच्या मते, "एखाद्या व्यवस्थेच्या संदर्भात व्यक्तीला जे स्थान प्राप्त होते त्या व्यवस्थेच्या संदर्भात व्यक्तीचा दर्जा ठरत असतो."

या दर्जाचे खालील दोन प्रकार पडतात.

अ) अर्पित दर्जा किंवा प्रदत्त दर्जा :- हा दर्जा व्यक्तीला जन्माच्या आधारे प्राप्त होत असतो. जन्माच्या, वंशाच्या, लिंगाच्या आधारे हा दर्जा व्यक्तीला प्राप्त होतो. अर्पित दर्जा या संकल्पनेची मांडणी सर्वप्रथम राल्फ लिंटन यांनी केलेली आहे.वयाच्या आधारेही दर्जा बहाल करण्याची पद्धत सर्वच समाजात आढळून येते. सर्वच समाजात लिंगावर आधारित दर्जा व्यक्तीला बहाल केलेला असतो .

ब) अर्जित किंवा स्व संपादित दर्जा :- प्रत्येक समाजात व्यक्तीला त्याचे गुण, कौशल्य, ज्ञान, शिक्षण, परिश्रम व कर्तुत्वाच्या आधारे कर्जा प्राप्त करण्याची व्यवस्था समाजाने केलेली असते. म्हणजे स्व कर्तुत्ववाने प्राप्त केलेल्या दर्जालाच  अर्जित दर्जा म्हणतात. दर्जा प्राप्त करण्याच्या दृष्टीने व्यक्तीला मिळणारी संधी प्रत्येक समाजापरत्व त्या त्या समाजाच्या विशिष्ट परिस्थितीवर अवलंबून असते. अर्जित दर्जा मिळण्याची संधी आजच्या औद्योगिक समाजात तर व्यक्तीला स्वकर्तृत्व दाखवून दर्जा संपादन करण्याकरिता विविध स्वरूपाची क्षेत्रे खुली झालेली दिसतात आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर व्यक्ती समाजात दर्जा प्राप्त करते. हा दर्जा प्राप्त करण्यासाठी व्यक्तीला वंश ,जन्म,लिंग यांची अट नाही.

**2) भूमिका:-**

सामाजिक दर्जाला अनुसरून व्यक्ती जे कार्य पार पाडते त्या कार्यालाच भूमिका असे म्हणतात. ही संकल्पना सर्वप्रथम पॅरेटो ने मांडली. भूमिका या शब्दाचा अर्थ समाजात व्यापक स्वरूपाचा आहे. राल्फ लिंटन यांच्या मते, भूमिका म्हणजे "स्थानांचा गतिशील असा पैलू होय."

टॉलकॉट पार्सन यांच्या मते,"कृतीत परिवर्तित झालेल्या दर्जास भूमिका म्हणतात."

**भूमिकेची वैशिष्ट्ये:-**

1. भूमिका बहुआयामी असतात.
2. व्यक्तीची भूमिका ही त्याची योग्यता आवड व मनोवृत्तीशी विशेष संबंधित असते.
3. व्यक्तीची सामाजिक भूमिका कालपरत्वे बदलत जाणारी असते.
4. भूमिके अंतर्गत मूल्य, विश्वास, व्यवहार या तीनही बाबी अंतर्भूत असतात.
5. भूमिका ही क्रियाशील असते व ती कोणत्या ना कोणत्या दर्जाशी जोडली गेलेली असते.
6. व्यक्तीची भूमिका ही त्याच्या इच्छेवर अवलंबून असते.
7. भूमिका ही शिकण्याची प्रक्रिया असून साधारणतः सामाजीकरणाद्वारा व्यक्ती ती आत्मसात करते.

**भूमिकांचे प्रकार:-**

1. अर्पित भूमिका
2. अर्जित भूमिका
3. आदर्श भूमिका
4. निर्धारित भूमिका
5. दांपत्व मूलक भूमिका
6. वास्तविक भूमिका
7. प्रतिभूमिका

**विवाह:-**

विभिन्न समाजशास्त्रीय, दर्शनीय, विचारवंत आणि चिंतक यांचे मान्य आहे की, प्राचीन काळात जेव्हा मानव आदीमावस्थेत होता तेव्हा बहुविवांचे प्रचलन होते. परंतु आजच्या काळात या विवाहाला एक सामाजिक विकृती म्हटले जाते. कारण प्राचीन काळात आदिमानव हतबल होता प्राचीन युगात स्त्री पुरुष मानवी भौतिक आवश्यकतांच्या पूर्ततेसाठी समानतेने काम करायचे प्राचीन काळी जनसंख्या अल्प होती जास्तीत जास्त प्रजोत्पादन करणे हे प्रमुख कार्य समजले जायचे आणि ती नैसर्गिक शक्ती स्त्रियांमध्ये आहे. शेवटी हा समाज मातृसत्ताक म्हणून ओळखला जायचा. नंतर या समाजात परिवर्तन होत गेले. पुरुष अन्न गोळा करण्यासाठी बाहेर पडत व सर्व कष्टाची कामे पुरुष करत असे म्हणून पुरेशीय मानसिकता वाढली आणि समाजात पुरुष हे उच्च मानले. म्हणून आज पितृसत्ताक समाज व्यवस्था निर्माण झाली आहे.

वेस्टर पार्क, "विवाह एक अथवा अधिक पुरुषांचे किंवा एकापेक्षा अधिक स्त्रियांसोबत होणाऱ्या प्रथा, कायदे, याद्वारा स्वीकृत संबंध आहे. ज्यापासून उत्पन्न होणारी मुले त्यांचे अधिकार आणि कर्तव्यांचा समावेश असतो."

स्त्री आणि पुरुष यांना पती-पत्नीच्या नात्याने कायमचे एकत्र राहण्यासाठी धार्मिक, सामाजिक आणि कायदेशीर संमती प्राप्त करणारा विधी म्हणजे विवाह होय.

**विवाहाची वैशिष्ट्ये:-**

1. अपरिहार्य विवाह
2. सामूहिक हिताला प्राधान्य
3. विवाह एक संस्कार
4. प्रौढ विवाह
5. बालविवाह
6. विवाहातील नियमने

भारतीय विवाह प्रकारात सार्वत्रिकता आढळते प्रौढ विवाह आढळतात परंतु बालविवाह हे आपल्या देशातून समुळ नष्ट झाले असे म्हणता येणार नाही. विवाहबाह्य संबंधांना भारतीय परंपरेत  व्याभिचार म्हटले जाते ते कारण समाजात व्यक्ती हितापेक्षा समाजहित महत्त्वाचे मानले जाते.

**विवाहाचे कार्य:-**

1. स्थिरता आणि कुटुंब निर्मिती
2. भावनात्मक व मानसिक आधार
3. प्रजोत्पादन व पालन पोषण
4. आर्थिक सहयोग
5. सामाजिक निरंतरता
6. लैंगिक संबंध सुरक्षितता

असे सर्व कार्य विवाह संस्थेचे आहे.

**विवाहाचे प्रकार :-**

विवाहातील जोडीदाराच्या संख्येच्या आधारे विवाहाचे एक विवाह व बहुविवाह असे दोन प्रकार पडतात.

एक पुरुष व एक स्त्री यांच्या विवाह एक विवाह असे म्हणतात. एक विवाह हा सार्वत्रिक स्वरूपाचा प्रकार असून तो भारतातील सर्वच समूहात आढळतो. हिंदू परंपरेने एक विवाह हा आदर्श प्रकार मानलेला आहे. एक विवाह सार्वत्रिक प्रकार आहे तसा बहुविवाह हा सार्वत्रिक प्रकार नाही

बहुविवाहाचे खालील दोन प्रकार पडतात.

अ) बहुपत्नी विवाह(Polygamy)

ब) बहुपति विवाह (Polyandry)

भारतात हे विवाह प्रकार आदिवासी समुदायात उदा: गोंड, नागा, बेगा, तसेच मुस्लिम समाजातही काही प्रमाणात हा प्रकार आढळतो.

1. एक विवाह
2. बहुविवाह
3. बहुपत्नी विवाह
4. बहुपति विवाह
5. भात्रू बहुपती विवाह
6. भगिनीबहुपत्नी विवाह
7. आंतरजातीय विवाह
8. सामूहिक विवाह
9. न्यायालयीन करार विवाह
10. प्रेम विवाह

अशाप्रकारे विवाहाचे अनेक प्रकार पडतात.अलीकडे काळात भारतातील विवाह संस्थेत मोठे बदल घडून आले आहेत. विवाह स्थितीचा पारंपारिक दृष्टिकोन, विवाहाची उद्दिष्टे विवाहाचे वय,विवाहाचे प्रकार, विवाहाचे नियमन, विवाहाचा जोडीदार, निवडण्याचे मार्ग आणि इतरही काही बाबतीत बदल घडून आले आहे. औद्योगिकीकरण, नागरीकरण, पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव, शिक्षणाचा प्रसार, वाहतुकीची व संप्रेषणाची साधने, सामाजिक चळवळी, लोकशाही व्यवस्था, सामाजिक कायदे इत्यादीमुळे हे परिवर्तन घडवून आले आहे.

**कुटुंब:-**

कुटुंब संस्था ही एक सामाजिक संस्था आहे. कुटुंबास एक सामाजिक समूह, एक सामाजिक घटक, एक मंडळ, एक संघटन आणि एक सामाजिक व्यवस्था सुद्धा मानले जाते. कुटुंबास खूपच महत्त्व आहे कारण ते व्यक्ती तसेच संपूर्ण समाज यांच्यासाठी महत्त्वाचे कार्य पार पाडते. त्यामुळे मानवी समाजात कुटुंबाला केंद्रस्थान प्राप्त झाले आहे. कुटुंबे हे कोणत्याही सामाजिक संरचनेचा कणा आहे. त्यामुळे कोणत्याही समाजाचे स्वरूप समजण्यासाठी कुटुंब संस्थेचा अभ्यास करणे आवश्यक आहे. ही गोष्ट भारतीय समाजासाठी लागू पडते त्यामुळे भारतीय समाजाचे स्वरूप समजण्यासाठी भारतीय कुटुंब संस्थेचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

मेक आईवर व पेज यांच्या मते," प्रजोत्पादन व अपत्यांचे संरक्षण संगोपन करण्यासाठी पर्याप्तपणे निश्चित व दीर्घकाळ टिकणाऱ्या लैंगिक संबंधावर आधारलेला समूह म्हणजे कुटुंब होय."

कुटुंब ही पालक आणि मुले यांच्यामध्ये अस्तित्वात असलेल्या परस्पर संबंधाची व्यवस्था आहे.

**कुटुंबाची वैशिष्ट्ये:-**

1. सार्वत्रिकता
2. विवाह वर आधारित
3. रक्त संबंध
4. समान निवासस्थान
5. भावनात्मकता
6. मर्यादित आकार

सदस्यांची जबाबदारी, सामाजिक नियमाने हे कुटुंबात दिसून येतात.

**कुटुंबाचे विविध प्रकार:-**

1) केंद्र कुटुंब/पाश्चात्य कुटुंब
2) संयुक्त कुटुंब
3) विभक्त कुटुंब
4) पितृसत्ताक कुटुंब
5) मातृसत्ताक कुटुंब
6) सापेक्षतः स्थिर कुटुंब
7) विस्तारित कुटुंब

अशाप्रकारे कुटुंब व्यवस्थेचे अनेक प्रकार पडतात. आज कुटुंबाचा आकार घटत आहे. औद्योगिकीकरण, नागरीकरण , व्यक्ती वाद इत्यादीमुळे पारंपारिक मोठ्या आकाराच्या संयुक्त कुटुंबाचे विघटन होत असून त्या जागी लहान आकाराची केंद्र कुटुंब स्थापन करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. सुशिक्षित जोडपे लहाना आकाराचे कुटुंब हे तत्व स्वीकारत आहे संतती नियमनांची साधने उपलब्ध झाल्याने कुटुंबाचा आकार लहान ठेवणे शक्य झाले आहे.

जागेची टंचाई, उच्च जीवनमानाची आकांक्षा, नोकरी करणे, धावपळीचे जीवन इत्यादीमुळे कुटुंबाचा आकार लहान होत चालला आहे. पारंपारिक कुटुंबे ही पितृसत्ताक होती त्यामुळे स्त्रियांचा दर्जा कनिष्ठ होता. परंतु आज कुटुंबाच्या कार्यात्मक पैलूमध्येही बदल घडवून आले आहे.

**निष्कर्ष:-**

सामाजिक संघटन, सामाजिक संरचना, विवाह, कुटुंब, मूल्य आणि नियमने हे सर्व घटक समाजाच्या कार्यप्रणालीत परस्परावलंबी आहेत या घटकामुळे समाजात स्थिरता सामाजिक व्यवहार यांचे सुयोग्य संचालन होते. बदलत्या काळात सामाजिक मूल्य आणि नियमाने यांच्यात बदल होत राहतो. परंतु कुटुंब आणि विवाह हे आजही समाजाचे मूलभूत स्तंभ मानले जातात. आधुनिक समाजातील नागरिकरण व औद्योगिकीकरण या प्रक्रियेबरोबर समाज व्यवस्थेत मोठा बदल होऊ लागला आहे. या समाजासमोरौ मूल्य हिनतेची समस्या निर्माण झाली आहे. जुनी मूल्य आज कमकुवत झाली आहे. कमकुवत मूल्यांची जागा नवीन मूल्यांनी न घेतल्यामुळे व्यक्तीचे वर्तन स्वच्छंदी होऊन समाजात अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होऊ लागल्या आहे स्वार्थी वृत्ती, भ्रष्टाचार, गुन्हेगारी या बाबी पुढे येऊ लागले आहे व्यक्तीसमोर केवळ पैसा कमावणे एवढेच एक उद्दिष्ट राहिल्याने व्यक्ती मूल्यांपासून दूर जाऊ लागला आहे. नवीन पिढी व्यक्तिगत संबंध, सामाजिक सुरक्षा व समानतेच्या आधारावर मूल्य निर्माण करण्यास तयार आहे. नवीन ज्ञान व नवीन मूल्य निर्माण करण्याची गरज या पिढीसाठी आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ:-**

1. सामाजिक संस्था--डॉ. शेख रशिदा रहेमतुल्ला
1. 2.मूलभूत समाजशास्त्र--डॉ. सुधीर येवले
2. समाजशास्त्रीय मूलभूत संकल्पना--डॉ. दिलीप खैरनार
3. समाजशास्त्रीय संकल्पना व व्याप्ती--डॉ. ज्योती डोईफोडे
4. मूलभूत सामाजिक संकल्पना-- प्रा. साहेबराव दगडू हिवाळे

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*